● मंगळवार, दि. १७ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १३९ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

भुजबळ यांना मंत्रिमंडळातून डावल्याने जालन्यात निदर्शने

## अजित पवारांच्या पोस्टरला जोडे मारुन ओबीसींनी केला निषेध



**जालना । प्रतिनिधी -** छगन भुजबळांना राज्य मंत्रीमंडळातून वगळण्यात आले. त्यामुळे जालन्यात ओबीसी आक्रमक झालेत. आज दि.१६ सोमावार रोजी दुपारी एक वा. च्या सुमारास जालना शहरातील गांधी चमन चौकात ओबीसींनी एकत्र येऊन राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्या विरोधात आंदोलन करत अजित पवार यांच्या पोस्टरला जोडे मारून या घटनेचा निषेध नोंदवलाय.छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात स्थान न दिल्यास आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत महायुतीच्या विरोधात भूमिका घेऊ असा ईशारा सत्संग मुंडे,स्थानिक ओबीसी नेते, यांनी दिलाय. यावेळी ओबीसी पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## भुजबळांना मंत्रिमंडळात घ्या, अन्यथा आगामी निवडणुकीत परीणाम भोगावे लागतील

### नवनाथ वाघमारे यांचा ईशारा

**जालना । प्रतिनिधी -** छगन भुजबळ, गोपीचंद पडळकर यांना मंत्रिमंडळात घेऊन कॅबिनेट मंत्री करा,अन्यथा स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महायुतीला परीणाम भोगावे लागतील असा ईशारा ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यासह अजित पवारांना दिलाय. आज दि.१६ सोमवार रोजी दुपारी बारा वा. च्या सुमारास शहरातील



एका हॉटेल मध्ये ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी पत्रकार परिषद घेतली. या पान २ वर

## ‘एवढ्या बहुआयामी व्यक्तीमत्त्वाला मंत्रीपदापासून का बरं डावललं?’

### परतूर-मंठा-नेर-सेवली जनतेला पडलेला भावनिक प्रश्न; सोशल मिडीयावर व्हायरल

**जालना । प्रतिनिधी-** राज्यात नुकत्याच निवडणुका पार पडल्या या निवडणुकीत महायुतीला भरघोस यश मिळाले. मुख्यमंत्री - उपमुख्यमंत्र्यांच्या शपथविधीनंतर रविवार (दि १५) रोजी मंत्रिमंडळाचा शपथविधी संपन्न झाला. यात जालना जिल्ह्याला डावलण्यात आले. कालपासूनच याच्या प्रतिक्रया उमटायला सुरुवात झाली. जालना जिल्ह्यात एकही आमदार मंत्रिपदाच्या लायक नाही का असाच प्रश्न जिल्ह्यातील जनतेला पडला आहे. त्यातच परतूर मतदार संघातून भाजपाचे विजयी शिलेदार आमदार बबनराव लोणीकर यांनाही मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने परतूर मतदार संघातून नाराजीचा सूर उमटत आहे. सोशल मिडीयावर विविध व्हिडीओ, इमेजेस व्हायरल होत आहे. या व्हायरल इमेजेस मधून ‘एवढ्या बहुआयामी व्यक्तीमत्त्वाला मंत्रीपदापासून का बरं डावललं?’ असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

व्हायरल झालेल्या इमेजेस मध्ये नमूद करण्यात आलेले आहे की, सुशिक्षीत आमदार, कार्यतत्पर आमदार, सर्वोत्तम कामगिरी करणारा आमदार, पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री, मराठवाडा वॉटर ग्रीड जनक, पाणी पुरवठा स्वच्छता खात्यात क्रांती करणारा मंत्री अनुभवी मंत्री पक्षनिष्ठ असणारा आमदार दूरदृष्टी व प्रचंड अनुभवातून मिळेल त्या खात्याला न्याय देणारा मंत्री







‘एवढ्या बहुआयामी व्यक्तीमत्त्वाला मंत्रीपदापासून का बरं डावललं?’ परतूर- मंठा- नेर- सेवली जनतेला पडलेला भावनिक प्रश्न...

तर दुसऱ्या एका व्हायरल होत असलेल्या इमेजस मध्ये कर्तबगार नेता, कार्यतत्पर मंत्री, सर्वोत्तम कामगिरी करणारा मंत्री, स्वच्छता खात्याला देशात नंबर एक नेणारा मंत्री, अनुभवणी मंत्री, पक्षाच्या पडत्या काळात पक्षाशी एकनिष्ठ, पक्ष संटनेच्या कार्यात कायम सक्रिय असलेला नेता, मराठवाड्याला दुष्काळ मुक्त करण्याची धमक असणारा नेता, कायम जनतेत राहून जनतेचे कामे करणारा मंत्री, ‘एवढ्या बहुआयामी

### आ. बबनराव लोणीकर यांचे कार्यकर्ते समर्थकांना संयम ठेवण्याचे आवाहन

नेत्याला मंत्रीपद का नाही? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे.

व्हायरल होत असलेल्या इमेजेसला आमदार बबनराव लोणीकरांनी उत्तर दिले असून कार्यकर्ते तसेच समर्थकांना संयम ठेवण्याचे आवाहन केले आहे. लोणीकरांनी म्हटले आहे की, माझा माझ्या वरिष्ठांवर विश्वास आहे, आणि तो कधीही कमी होणार नाही. आज जे माझ्यासोबत घडले त्याचे मी कधीही चिंतन करणार नाही, एक नवी दिशा एक नवी उमंग, नवीन उत्साह आणि पुन्हा नव्याने दीन दलित, शेतकरी शेतमजूर बांधवांच्या सेवेत मी असणार आहे. जे पाच वर्ष पुन्हा मला दिले आहेत. त्याचे सोने मी केल्या शिवाय राहणार नाही. पुन्हा नव्या जिद्दीने मी आता कामाला लागतो आहे. आपण सुद्धा संयम ठेऊन नाराज न होता जनसेवेसाठी सज्ज व्हायचे आहे. या शासनामध्ये जे मंत्री झाले आहेत त्यांचे अभिनंदन करतो.

युवा आदर्श

### बदली ...

अधिकाऱ्यांचीबदली
कसरत भलती मोठी
उसळली दाटी वाटी
मोक्याच्या जागेसाठी
भाग्यपालट करायचा
उचीत बोटात अंगठी
सर्व ग्रह शांत कराया
गृह खाते जादू काठी
निती नियमास पाळून
बरोबर नेमावी सोंगटी
उत्साह हवा वाढवायं
धगधगत ठेवा आगटी
नाड्या सगळ्या पहा
शक्ती आपले मनगटी
आजू बाजूला सैनीक
खुर्चीला द्या बळकटी
चकीत करेलं पोस्टींग
उलटी होणारं भृगुटी
संतुष्ट करे कुणाकुणा
हवी प्रत्येका सिंहकटी
भाग्य आपल्या हातात
रे रेषा तेवढ्या ललाटी
स्टेशन मास्तर ठरवतो
कुठली गाडी फलाटी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## भोरखेडा येथे श्रीगुरूदत्त जयंतीनिमित्त महाप्रसादाचा कार्यक्रम उत्साहात



**माहोरा । प्रतिनिधी -** जाफ्राबाद तालुक्यातील भोरखेडा येथील रामराव गुरुजी कोरडे, समाधान कोरडे, कैलास कोरडे, यांच्या विशेष पुढाकाराने गेल्या २४ वर्षा पासुन दरवर्षी गुरूदत्त जयंतीच्या दुसऱ्या दिवशी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते . गेल्या २४ वर्षाची परंपरा कायम ठेवत या वर्षीही भोरखेडा येथील रामराव गुरुजी कोरडे यांच्या शेतात श्री गुरुदत्ताचे ठिकाण असुन या ठिकाणी गुरुपौर्णिमांच्या दुसऱ्या दिवशी मोठ्या भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले परिसरातील महिला पुरुषांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या महाप्रस- ादाचा लाभ घेतला. या वेळी पो. पा. विठ्ठल पा. कोरडे, पान २ वर

### कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र

## ‘कुसुम’ मोहीम राबविणार

**जालना । प्रतिनिधी -** शाश्वत विकास ध्येयाच्या अंतर्गत केंद्र शासनाने सन २०२७ पर्यंत शुन्य कुष्ठरुग्ण प्रसार हे उद्दिष्ट निश्चित केले आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी समाजातील लपलेले कुष्ठरुग्ण शोधुन त्यांना बहुविध उपचाराखाली आणणे आवश्यक आहे. याकरीता नियमित/विशेष सर्वेक्षणामध्ये वंचित राहणाऱ्या/दुर्लक्षित राहणाऱ्या गटांवर उदा. विटभट्टी कामगार, खाण कामगार स्थलांतरीत व्यक्ती, बांधकाम मजूर, निवासी /आश्रमशाळेत राहणारे विद्यार्थी, कंपनीत काम करणारे कामगार इ. वर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. वरील गटातील लोक हे कामाकरीता/मजूरीकरीता लवकर घर सोडतात व उशिरा घरी परत येतात. यामुळे अशा व्यक्तीची आरोग्य तपासणी नियमित सर्वेक्षण अथवा कुष्ठरोग शोध मोहिमेमध्ये होत नाही. केंद्राच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्व जिल्ह्यायामध्ये १६ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२४ या कालावधीत अतिजोखमीच्या भागात कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम) हे अभियान राबविण्यात येणार आहे.

जालना जिल्ह्यात कुसुम अभियानाअंतर्गत वेगवेगळ्या उपेक्षित गटांचे दि.१६ डिसेंबर ते २० डिसेंबर २०२४ या पाच दिवसांच्या कालावधीत आशा व आरोग्य कर्मचारी यांच्या मदतीने प्रत्यक्ष सर्वेक्षण होणार आहे. जिल्हयात २१४ उपेक्षित ठिकाणावर विशेष लक्ष केंद्रित करुन जवळपास १४ हजार ९१२ व्यक्तींची शारीरीक तपासणी पान २ वर

## टेंभुर्णीतील बसस्थानकाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

### आमदार संतोष दानवे यांनी लक्ष देण्याची मागणी

**टेंभुर्णी । प्रतिनिधी-** येथील बस स्थानकाची समस्या सुटणार कधी असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हा प्रश्न ऐरणीवर आहे. आमदार संतोष दानवे यांनी या विषयाकडे लक्ष द्यावे अशी मागणी प्रवाशांमधून होत आहे.

जवळपास वीस हजार लोकवस्तीचे टेंभूर्णी हे गाव असून या ठिकाणी बस स्थानकच नाही. त्यामुळे एसटी बसची प्रतिक्षा करीत प्रवाशांना तासन्तास ताटकळत उभे राहावे लागत आहे. नुकतेच आमदार झालेले संतोष दानवे यांनी तिसऱ्यांना भोकरदन मतदार संघातून विजय मिळविला आहे त्यामुळे टेंभुर्णीसह परिसरातील जनतेला त्यांच्याकडून बस स्थानकासाठी मोठी अपेक्षा आहे.

टेंभुर्णी ही मुख्य बाजार पेइ असून या गावाला आसपासच्या ३० ते ३५ खेड्यांचा संपर्क आहे. या सर्व खेड्यांवरून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना येथील बस स्थानकावरूनच बस धरावी लागते. त्यामुळे प्रवाशांना या गैरसोयीच्या थांब्याचा त्रास सहन करावा लागत आहे. या शिवाय मुख्य चौकात हा बस थांबा आल्याने अनेका छोटे-मोठे अपघातही या ठिकाणी होत असतात.

आमदार संतोष दानवे यांनी या गंभीर बाबीकडे लक्ष घालून टेंभुर्णीकरांचा बस स्थानकाचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी होत आहे.

टेंभुर्णी येथे जुन्या काळापासून गावात कॅन्टीनसह छोटे बसस्थानक होते. त्यामुळे जालना किंवा जाफराबादकडे जाणारी प्रत्येक बस गावातील बसस्थानकावरून जायची. मात्र, मागील काही वर्षांपासून गावात टेंभुर्णी बस थांब्यावर बस आली की प्रवाशांना रस्त्याच्या कडेला थांबून बस येण्याची वाट बघावी लागते.

जाणाऱ्या रस्त्यावरील रहदारीची अडचण सांगत एसटी महामंडळाने गावात बस आणणे बंद केले. त्यामुळे मागील २५ ते ३० वर्षांपासून गावातील बसस्थानक बंद पडले आहे. आता येथील



छत्रपती शिवाजी महाराज चौकातूनच एसटी बस परस्पर निघून जाते. या ठिकाणी प्रवाशांना बसण्याची तर सोडा मात्र उभे राहण्याचीही कुठलीही व्यवस्था नाही. त्यामुळे महिला, वृद्ध व आजारी प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागतो. शिवाय, या बसथांब्यावरून एसटी बसच्या रोज ६० ते ७० फेऱ्या होत असतात. त्यामुळे या ठिकाणी मोठे प्रशस्त बसस्थानक असणे गरजेचे आहे. गावातील जुन्या बसस्थानकाच्या जागेवर किंवा बाजारपट्टीच्या जागेवर प्रशस्त बसस्थानक बांधावे, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.

परिसरात कुठेही स्वच्छतागृह नसल्याने विशेषतः महिला प्रवाशांची मोठी कुचंबणा होते. दरम्यान, या ठिकाणी प्रशस्त बसस्थानक बांधून वर्षानुवर्षांपासून होणारी प्रवाशांची गैरसोय दूर करावी, अशी मागणी होत आहे.

आमच्या वृत्त प्रतिनिधीशी बोलताना एका सुज्ञ प्रवाशांनी सांगितले की टेंभुर्णीच्या बस स्थानकाचा प्रश्न हा गावाततील बस स्थानक हे वरच्या बस स्टॅन्डला नेल्यामुळे ही समस्या उद्‌भवली आहे. गावात बस स्टॅन्ड होते. या गावात वैजापूर तसेच जालना येथून बस स्थानकामध्ये बसेस येत होत्या. हे बस स्थानक वरच्या बस स्टॅन्ड ला गेल्यामुळे गावातील बस स्थानक परिसरातील व्यापाऱ्यांचा व्यापार कमी झाला असा सुद्धा व्यापाऱ्यांचा रोष आहे, गावकऱ्यांना दोन पान २ वर

## संपादकीय पान

# शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्तीबरोबरच स्वयंशिस्त हा यशाचा मूलमंत्र - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा ११२ वा दीक्षान्त समारंभ संपन्न




**नागपूर -** जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर स्वयंशिस्त असणे अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्तीबरोबरच यशस्वीतेसाठी स्वयंशिस्त यशाचा मूलमंत्र असल्याचे प्रतिपादन राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती सी.पी. राधाकृष्णन यांनी केले.

ऑडिटोरियम हॉल, नॅशनल फायर सर्विस कॉलेज येथे आयोजित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ११२ व्या दीक्षान्त समारंभात राज्यपाल श्री. राधाकृष्णन बोलत होते.

यावेळी प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. राजेंद्र काकडे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. समय बनसोड, परीक्षा व मूल्यमापन मंडळ प्रभारी संचालक तथा वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, विविध विभागांचे अधिष्ठाता प्राचार्य प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ११२ व्या दीक्षान्त समारंभात सहभागी होणे अत्यंत आनंदाची आणि गौरवास्पद असल्याचे सांगत सर्व पदवीधर, पदक विजेते आणि पुरस्कारप्राप्त विद्यार्थ्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या. विद्यापीठाने नुकतीच आपली शतकपूर्ती साजरी केली असून राष्ट्रनिर्माण कार्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे. त्याचप्रमाणे शतकभरात अनेक प्रख्यात माजी विद्यार्थी घडविले असल्याचे राज्यपाल म्हणाले.

विद्यापीठाने मध्य भारतातील विद्यार्थ्यांना समग्र शिक्षणाचे धडे दिल्याचे प्रतिष्ठित माजी विद्यार्थ्यांच्या यादीवर नजर टाकल्यास लक्षात येते. आदर्श नेते, महान तंत्रज्ञ, जागतिक दर्जाचे शास्त्रज्ञ, उत्कृष्ट कलाकार, महान शिक्षक आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे चांगली माणसं तयार करण्याचे कार्य विद्यापीठाने केले आहे. विद्यापीठाने आपल्या शतकपूर्तीनिमित्त भारतीय विज्ञान काँग्रेस, भारतीय औषधशास्त्र विज्ञान काँग्रेस, राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास कार्यक्रम यांसारख्या अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आणि कार्यक्रम यशस्वीपणे राबवले. विद्यापीठाने दाखवलेली संशोधनाची दिशा देखील प्रशंसा करण्याजोगी आहे आणि विद्यापीठातील तरुण संशोधकांना त्यांच्या भविष्यातील प्रयत्नांसाठी, विशेषतः स्थानिक समुदायाच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने, जागतिक नेते बनण्याच्या मार्गावर त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू करण्यात आले आहे. प्रधानमंत्री नरेद्र मोदी यांच्या 'विकसित भारत २०४७' या महत्त्वाकांक्षी मिशनच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल ठेवणारे हे धोरण असल्याचे राज्यपाल श्री. राधाकृष्णन यावेळी म्हणाले.

स्वागतपर भाषणात प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी विद्यापीठाच्या आतापर्यंतच्या वाटचालीची माहिती दिली.

**पुरस्कारांचे वितरण**

एनएमडी महाविद्यालय गोंदिया येथील विद्यार्थिनी प्रगती रमेश छतवानी यांना ६ सुवर्ण पदके, डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नागपूर येथील विद्यार्थिनी रूपाली केवलराम देशपांडे यांना ४ सूवर्ण पदके व १ पारितोषिक, डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नागपूर येथील विद्यार्थी नूतन पांडुरंग इंगोले यांना ४ सुवर्णपदके व १ पारितोषिक तसेच डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय नागपूर येथील विद्यार्थी अजय सुखदेव नरांजे यांनी एमए (डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा) परीक्षेत सर्वात अधिक एकत्रित वर्ग गुण सरासरी प्राप्त करून ४ सुवर्णपदके व १ पारितोषिक, विद्यापीठ जनसंवाद विभागातील तेजस अतुल पाटील याने ३ सुवर्णपदक व एक पारितोषिक, विद्यापीठ पदव्युत्तर गृहविज्ञान विभागातील दिव्या अनिल पैतोड हिला ४ सुवर्ण पदके देऊन गौरविण्यात आले. श्री बिंजानी सिटी कॉलेज नागपूर येथील केदार विश्वनाथ खोब्रागडे ४ सुवर्णपदक तर विद्यापीठाची वयाच्या ६५ व्या वर्षानंतर आचार्य पदवी संपादन केल्याबद्दल योगतज्ञ डॉ. विठ्ठलराव जिपकाटे पारितोषिक रामदास बुचे यांना प्रदान करण्यात आले.

**१ लाख ३ हजार ३०३ विद्यार्थ्यांना पदवी वितरण**


दीक्षान्त समारंभात १,०३,३०३ विद्यार्थ्यांना पदवी, पदविका प्रदान करण्यात आल्या. यामध्ये स्नातक पदवीधर ८४,३१० विद्यार्थी तर स्नातकोत्तर पदवीधर १८,७७२ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. संलग्नित महाविद्यालयांतील पात्र पदवीकांक्षींची (डिग्री सर्टिफिकेट) विद्याशाखा निहाय संख्या : विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा - ३७,९६७, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा - २५,१४१, मानव विज्ञान विद्याशाखा - २४,१६०, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा - ८,५२२, स्वायत्त महाविद्यालये - ६,७५८, पदविका प्रमाणपत्र -७५५

**आचार्य पदवी प्रदान**

या दीक्षान्त समारंभात विद्या शाखा निहाय २२१ संशोधकांना आचार्य पदवी देऊन सन्मानित करण्यात आले. आचार्य पदवीधारकांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेत ९०, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेत ५२, मानवविज्ञान विद्याशाखेत ६९, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेत १० आदींचा समावेश आहे. तसेच १ विद्यार्थी एम.आर्च. (बाय रिसर्च) या पदव्युत्तर पदवी प्रदान करण्यात आली.

## भय, भूक आणि भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र!

राज्यात भाजप, शिवसेना ( शिंदे गट ) व राष्ट्रवादी काँग्रेस ( अजित पवार गट ) यांचे महायुती सरकार विक्रमी बहुमताने स्थापन झाले. आजवर कोणत्याच सरकारला मिळाले नाही इतके विक्रमी बहुमत या सरकारला महाराष्ट्रातील मतदारांनी दिले आहे. या सरकारचा शपथविधी समारंभ नुकताच मोठ्या थाटामाटात पार पडला. माननीय देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची तर माननीय एकनाथ शिंदे व माननीय अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. ३९ आमदारांनी देखील नागपुरात मंत्रीपदाची शपथ घेतली. नवीन मंत्रिमंडळ अस्तित्वात येताच सरकार क्शन मोड मध्ये आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सर्व विभागाची बैठक घेऊन सचिवांना पुढील शंभर दिवसांचा कार्यक्रम आखण्यास सांगितले आहे. जनातेच्याही या सरकारकडून खूप अपेक्षा आहेत. एक तरुण म्हणून मला तरुणांचे प्रश्न महत्वाचे वाटतात. नव्या सरकारने तरुणांना रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न करायला हवेत. कारण गेल्या चार पाच वर्षात राज्यात बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. शिक्षण व गुणवत्ता असूनही तरुणांच्या हाती काम नाही त्यात आर्थिक मंदी आणि कोरोणाने अनेक तरुणांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. सरकारी नोकरभरती बंद आहे. रोजगार नसल्याने राज्यातील तरुण नैराश्याच्या गर्तेत अडकला आहे. या तरुणांना नैराश्याच्या गर्तेतून बाहेर काढायचे असेल तर रोजगार निर्मितीसाठी सरकारने ठोस प्रयत्न करायला हवेत. बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी उद्योगधंदे वाढीला लागतील यासाठी सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. मुख्यमंत्र्यांनी नोकर भरतीचे आश्वासन दिले आहे ही आनंदाची बाब असली तरी ही नोकरभरती कंत्राटी नको तर कायम स्वरूपाची हवी. मागील सरकारने नोकर भरतीचे दिलेले आश्वासन हवेतच विरले. या सरकारने तरी नोकर भरतीचे दिलेले आश्वासन पूर्ण करावे. राज्यातील ४० टक्के लोकसंख्या १८ ते ४५ या वयोगटातील आहे या तरुणांमध्ये प्रचंड ऊर्जा आहे. मेहनत करण्याची त्यांची तयारी आहे. त्यांच्या मेहनतीचा आणि ऊर्जेचा सरकारने उपयोग करून घेतल्यास महाराष्ट्र देशातील नंबर १ चे राज्य बनेल यात शंका नाही. बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी सरकारने उद्योगधंदे वाढीला लागतील यासाठी धोरणात्मक निर्णय घ्यायला हवेत. मागील काळात महाराष्ट्रातील काही उद्योग गुजरातमध्ये गेल्याचे आपण पाहिले आहे आता तरी महाराष्ट्रातील उद्योग दुसऱ्या राज्यात जाणार नाही याची दक्षता सरकारने घ्यावी. उद्योगधंद्यात महाराष्ट्र देशात अव्वल क्रमांकावर ठेवण्याचे मोठे आव्हान या सरकारपुढे आहे. महाराष्ट्रात मोठे उद्योग आले तर रोजगारी कमी होऊन राज्याची अर्थव्यवस्था गतिमान होईल. महायुती सरकारने जे विक्रमी बहुमत मिळवले आहे त्यात राज्यातील लाडक्या बहिणींचा मोठा वाटा आहे. राज्यातील लाडक्या बहिणींनी महायुतीला भरभरून मते दिली आता सरकारनेही लाडक्या बहिणींना विसरु नये. लाडक्या बहिणींना दिलेले २१०० रुपयांचे आश्वासन पूर्ण करावे. त्यासोबतच महागाई करून दाजिंनाही दिलासा द्यावा. लाडक्या बहिणींच्या खात्यावर पैसे पाठवले म्हणजे सरकारचे काम संपले असे नाही तर लाडक्या बहिणींच्या संरक्षणाची जबाबदारी देखील सरकारने घ्यायला हवी. राज्यात महिला अत्याचाराच्या अनेक घटना घडल्या आहेत. तीन वर्षाच्या चिमुरडी पासून साठ वर्षाच्या आजीपर्यंत सर्व वयोगटातील महिला अत्याचाराच्या बळी ठरत आहेत. सरकारने महिला अत्याचाराच्या घटनांना आळा घालून आणि नराधमांना कठोर शिक्षा द्यावी. मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले शक्ती विधेयक या सरकारने मंजूर करून त्याची अंमलबजावणी करावी. महाराष्ट्र हे शेतीप्रधान राज्य आहे. मागील काही काळापासून राज्यातील शेतकरी सरकारी धोरणावर नाराज आहे. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव नाही. सरकारने शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव देत शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवावेत. शेतकऱ्यांसोबत कष्टकरी, कामकरी आणि व्यापारी वर्गाचे देखील प्रश्न सरकारने प्राधान्याने सोडवावेत. जनतेचा सर्वाधिक पैसा शिक्षण आणि आरोग्यावर खर्च होतो. या सरकारने जनतेचा शिक्षण आणि आरोग्यावर होणारा खर्च कमी करावा. राज्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण आणि नागरिकांना निरोगी आरोग्य लाभेल या दृष्टीने सरकारने धोरणे आखावित. सरकारने सर्वांना परवडेल अशा माफक दरात आरोग्यसेवा पुरवावी. के जी ते पी जी शिक्षण मोफत करावे. या सरकारने इंदु मिल मधील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक, छत्रपती शिवाजी महाराज यांचे अरबी समुद्रातील स्मारक तसेच बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकांच्या कामाला गती द्यावी. या सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून त्या सोडवण्याचा प्रयत्न करावा. सरकारी कर्मचाऱ्यांसाठी जुनी पेन्शन योजना लागू करावी. जलसिंचन, नदी जोड सारखे प्रकल्प राबवावेत. सरकारने प्रशासनातील भ्रष्टाचार मोडून काढावा. राज्यातील स्त्रिया, मुलींना सुरक्षित वाटेल असे कायद्याचे राज्य स्थापन करावे. जाती - जातीत, धर्मा - धर्मात तणाव वाढत आहे. हा तणाव कमी करून राज्यात सौहार्दाचे वातावरण निर्माण करावे. एकूणच या सरकारने भय, भूक आणि भ्रष्टाचारमुक्त महाराष्ट्र निर्माण करावा.



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# खासदार सांस्कृतिक महोत्सवामुळे नागपूरकरांना देशभरातील कलावंतांना अनुभवण्याची पर्वणी - मुख्यमंत्री

**नागपूर -** खासदार सांस्कृतिक महोत्सवाने नागपूर, विदर्भाला देशभरातील विचारवंत, कलावंतांना ऐकायला, पाहायला तसेच अनुभवण्याची संधी दिली. महोत्सवाची ही पर्वणी अशीच लाभत राहील, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी आज खासदार सांस्कृतिक महोत्सवास भेट दिली. त्यावेळी मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, मंत्री पंकजा मुंडे, आ.मंजुळा गावित, आ.अमित गोरखे, माजी आमदार अनिल सोले, दैनिक हितवादचे व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र पुरोहित, उद्योजक यशपाल आर्य, पदमेश गुप्ता, यशपाल गुप्ता आदी उपस्थित होते.

देशभरातीलच नाही तर आपल्या भागातील कलावंतांसाठी देखील खासदार सांस्कृतिक महोत्सव मोठे व्यासपीठ, दालन ठरले आहे. महोत्सवातील वेगवेगळ्या सांस्कृतिक स्पर्धांमधून नागपूरचे सांस्कृतिक क्षेत्र उजळून निघेल. या महोत्सवाच्या आयोजनासाठी आयोजन समितीचे आभार मानतो. मुख्यमंत्री झाल्यानंतर नागपुरातील हा माझा पहिलाच जाहीर कार्यक्रम आहे, त्याचा विशेष आनंद असल्याचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले.

महोत्सवातील कार्यक्रम अतिशय चांगल्या प्रकारे पार पडतात. हा महोत्सव नागपूरकरांच्या जीवनाचा अंग झाला आहे. कुमार विश्वास यांच्यासारख्या लेखक, कवी, विचारवंताच्या कार्यक्रमात उपस्थित राहता आल्याचा आनंद आहे. कुमार विश्वास उपस्थितांना मंत्रमुग्ध करतात. ते केवळ तत्वच सांगत नाही तर तात्विकतेने जगत असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. कुमार विश्वास यांच्या 'अपने अपने राम' या कार्यक्रमासदेखील मुख्यमंत्री श्री.फडणवीस उपस्थित राहिले.

खासदार महोत्सवातून स्थानिक कलावंतांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न आहे. मनोरंजनातून सांस्कृतिक अभिरुची, लोकप्रबोधन, लोकसंस्कार होत आहेत. महोत्सवासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सहकार्य, समर्थन लाभते, असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले.

## मुख्य न्यायदंडाधिकारी कार्यालयातील वाहनाची १८ डिसेंबर रोजी लिलावाद्वारे विक्री




**मुंबई -** मुख्य न्यायदंडाधिकारी मुंबई या कार्यालयातील मारुती स्विफ्ट डिझायर (पेट्रोल) हे वाहन जाहीर लिलाव पद्धतीने विक्री करण्यात येणार आहे. या वाहनाचा लिलाव दि. १८ डिसेंबर २०२४ रोजी मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे कार्यालय, एस्प्लनेड, महापालिका मार्ग, मुंबई ४००००१ येथे होणार असून दि. १७ डिसेंबर २०२४ पर्यंत सकाळी ११ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत पहावयास मिळेल.

या वाहनाची बोलीची सुरुवातीची किंमत ६० हजार एवढी आहे. अधिक माहितीकरिता सहा. प्रबंधक (लेखनसामग्री) मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे कार्यालय, एस्प्लनेड, मुंबई यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

# 'लोकराज्य' च्या दुर्मिळ अंकांचे डिजिटायजेशन करावे - प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

### विधानभवन परिसरात 'लोकराज्य दुर्मिळ अंक' प्रदर्शनाचे उद्घाटन

**नागपूर -** 'लोकराज्य' चे दुर्मिळ अंक हे माहितीचा अमूल्य ठेवा असून त्याचे जतन व संवर्धन होण्याकरिता या अंकांचे डिजिटायजेशन करण्याच्या सूचना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी विधानभवन परिसरातील लोकराज्य दुर्मिळ अंक प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी केले.

नागपूर-अमरावती विभाग संचालक कार्यालयाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनास मंत्री, आमदार व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी भेट देऊन राज्याच्या गौरवशाली परंपरेच्या माहितीचा ठेवा असणाऱ्या या प्रदर्शनाचे कौतुक केले.

उद्घाटन प्रसंगी नागपूर-अमरावती विभागाचे संचालक (माहिती) डॉ. गणेश मुळे, लोकराज्यचे संपादक तथा संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क) दयानंद कांबळे, छत्रपती संभाजीनगर विभागाचे संचालक (माहिती) किशोर गांगुर्डे, वरिष्ठ पत्रकार धर्मेंद्र जोरे, नागपूर जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार, वर्धा जिल्हा माहिती अधिकारी रवि गिते, चंद्रपूर जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर आदी यावेळी उपस्थित होते.

महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी प्रदर्शनाची पाहणी केली. तसेच या दुर्मिळ अंकांचा ठेवा अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी डिजिटायझेशन आणि अन्य आधुनिक पद्धतीचा उपयोग करण्याच्या सूचना यावेळी दिल्या. दुर्मिळ अंकांच्या मांडणीचे कौतुकही त्यांनी केले.

**प्रदर्शनात वैविध्यपूर्ण माहितीचा ठेवा असणारे दुर्मिळ अंक**

१९६४ पासूनचे अंक येथे प्रदर्शित करण्यात आले आहेत. संत ज्ञानेश्वर आणि कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त प्रकाशित अंक, मराठी संगीत रंगभूमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, यशवंतराव चव्हाण, मराठवाडा विकास व सांस्कृतिक अंक, स्वातंत्र्यदिन विशेषांकासह महाराष्ट्र राज्यातील महान व्यक्तीमत्वे, सांस्कृतिक, भौगोलिक, आर्थिक असा वैविध्यपूर्ण ठेवा तसेच शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती असणारे १५० अंक या ठिकाणी प्रदर्शित करण्यात आले आहेत.

**मान्यवरांच्या भेटी व सेल्फी स्टँडवर छायाचित्रे**

विधीमंडळ अधिवेशनाचा पहिलाच दिवस असल्याने विधानभवन परिसरात विधानसभा व विधानपरिषद सदस्यांची लगबग होती. वाटेतच लोकराज्य दुर्मिळ अंकांचे आकर्षक प्रदर्शन दिसताच त्यांनी प्रदर्शनास भेट दिली. यावेळी पाहणी करून आपल्या प्रतिक्रियाही नोंदविल्या. याठिकाणी उभारण्यात आलेल्या सेल्फी स्टँडवर पोज देऊन छायाचित्रेही काढून घेतली.

पान १ वरुन

## भुजबळांना मंत्रिमंडळात ...

पत्रकार परिषदेच्या माध्यमातून वाघमारे यांनी हा ईशारा दिला.

शरद पवारांच्या सांगण्यावरूनच अजित पवारांनी छगन भुजबळांना मंत्रिमंडळातुन डावललं असा आरोप वाघमारे यांनी केला.

## भोरखेडा येथे ...

अंकुश पा. कोरडे, संतोष पा कोरडे, कौतिक हिरेकर, गजानन कोरडे, शिवलाल कल्याणकर, कृष्णा कोरडे, जनार्धन कोरडे, शेषराव कोरडे, रमेश कल्याणकर, योगेश कोरडे, पिंटु पोफळे, आदिंसह कोरडे परिवार व महिलांनी श्री. गुरुपौर्णिमेला महाप्रसादाचा कार्यक्रमात विशेष सहभाग घेताला.

## कुसुम मोहिम ...

करण्यात येणार आहे. या तपासणी करीता जिल्हयात १२३ पथक तयार करण्यात आले आहेत व ८ पर्यवेक्षक नेमण्यात आले आहेत.

जोखीमग्रस्त भागातील महीलांची तपासणी आप्शा स्वयंसेविकांमार्फत व पुरुप सभासदाची तपासणी पुरुप आरोग्य कर्मचारी यांच्या मार्फत केली जाणार आहे. मोहिमेमध्ये शोधलेल्या संशयीत रुग्णांची वैद्यकीय अधिकारी तपासणी करुन निदान करणार आहे.

तसेच नविन शोधण्यात आलेल्या कुष्ठरुग्णांच्या सहवासात असलेल्या व्यक्तींना कुष्ठरोगाची लागण होऊ नये म्हणून रिफाम्पिसिन औषधीची एक मात्रा (पीईपी) देण्यात येणार आहे. तरी तपासणी करीता घरी येणाऱ्या पथकामार्फत तपासणी करुन घेण्यात यावी असे आरोग्य विभागाकडून आवाहन करण्यात येत आहे.

**कुष्ठरोग लक्षणे -** त्वचेवर फिकट, लालसर बधीर चट्टा व त्या ठिकाणी घाम न येणे.जाड, बधीर, तेलकट / चकाकणारी त्वचा. त्वचेवर गाठी असणे, कानाच्या पाळया जाड होणे.हातापायाची बोटे वाकडी असणे, मुंग्या येणे/बधीरता असणे.भुवयांचे केस विरळ होणे, डोळे पुर्ण बंद करता न येणे. त्वचेवर थंड व गरम संवेदना न जाणवणे.अशी माहिती सहाय्यक संचालक डॉ. सुधाकर शेळके यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

## टेभुर्णीतील बस ...

किलोमीटर पर्यंत बस स्थानकासाठी यावे लागते, गावात बस स्थानकाचे छोटे बस स्थानक बांधलेले असून, एस टी महामंडळ त्याकडे कधीच लक्ष देत नाही, त्याच्या अवतीभवती अतिक्रमण झालेले आहे, ते कोणाला भाड्याने देतात कोणाला देत नाही याची सुद्धा चौकशी होत नाही, तसेच त्याचे जर भाडे वसूल होत असेल तर बस स्थानकापर्यंत बस का जात नाही हा मोठा प्रश्न त्या प्रवाशांनी उपस्थित केला. एस टी महामंडळ याकडे लक्ष देईल काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

# होमी भाभा परिक्षेत परतूरच्या विवेकानंद इंग्लिश व विवेकानंद पब्लिक शाळेचे यश




**परतूर । प्रतिनिधी -** दि.३० नोव्हेंबर रोजी घेण्यात आलेल्या होमी भाभा परिक्षेत विवेकानंद इंग्लिश स्कूल परतुर च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यशाची परंपरा कायम राखली आहे. यावर्षी इ. ०९ वी व ०६ चे अनुक्रमे १९ विद्यार्थी, १९ विद्यार्थी पास झाले असून ०९ वी तून कु. शरयू चंद्रशेखर भांडवलकर तर इ. ०६ वी तून कु. आदित्री प्रमोद आकात व चि. हर्ष जगन्नाथ बागल यांची पुढील प्रात्यक्षिक फेरी साठी निवड झाली आहे.

तसेच विवेकानंद पब्लिक स्कूल परतुर ची इ. ०६ वी विद्यार्थीनी कु. इश्वरी गणेश उबाळे ही विद्यार्थिनी पास झाली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्था अध्यक्ष, डॉ. एस. जी. बाहेकर यांनी केले तर शालेय समिती अध्यक्ष, संदीप दादा बाहेकर यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# जाफराबाद तालुक्यात श्री दत्त जयंत्तीनिमित्त अनेक ठिकाणी महाप्रसादाचे कार्यक्रम

**जाफराबाद । प्रतिनिधी** - तालुक्यातील विविध ठिकाणच्या गावातील श्री दत्त मंदीरामध्ये श्री दत्त जयंत्ती सप्ताहानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या सर्व सप्ताहाची सांगता महाप्रसाद वाटप करून करण्यात आली जाफराबाद शहरातील आदर्शनगरातील श्री स्वामी समर्थ सेवा व अध्यात्मिक कें द्रामध्ये श्री स्वामी समर्थ महाराजांची त्र क ढ ल म हाआरती, नैवेद्रय, महाप्रसाद, सामुहीक गुरुचरित्र पारायणाचे पठण, भजन आदि धार्मिक कार्यक्रम प्रतिदिनी आयोजित करण्यात आले होते तर दत्त जयंत्ती दिनी ह.भ.प. वैजयंती सिन्नरकर यांचे प्रवचन, श्री दत्तात्रय जन्म सोहळा, पारायण, महाआरती, नैवेद्रय, महाप्रसाद, भजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. दत्त जयंत्ती उत्सव सोहळ्यास लाभ घेतला... तर येथील सरदारसिंह यांच्या मळ्यातील श्री दत्त मंदीर, ब्राम्हण गल्लीतील श्री नवनाथ संस्थानचे घेतला.





जाफराबाद तालुक्यातील खापरखेडा येथील श्री दत्त मंदीरात विविध धार्मिक दिपोत्सव अगदी थाटात साजरा करण्यात आला.

तर ब्राम्हण गल्लीतील श्री कानिफनाथ संस्थान मध्ये देखिल अनंत महाराज देशपांडे यांच्या नियोजनातून गुरुचरित्र ह.भ.प. अंबरीश महाराज सोनईकर यांच्या कीर्तनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

यावेळी शहरातील अनेक भाविकांनी महाप्रसादाचा मठाधिपती ह.भ.प. भास्कर महाराज देशपांडे यांच्या म ार्गदर्शनाखाली श्री दत्त जयंत्ती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते याठिकाणी सुद्धा भाविकांना महाप्रसादाचा लाभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात होते या ठिकाणी दत्त जयंती निमित्त दरवर्षी प्रमाणे मोठी यात्रा भरली होती, येथील सांगता सोहळ्याला मोठा म हाप्रसाद महापगंत झाली.

# औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये १९ डिसेंबर रोजी भरती मेळाव्याचे आयोजन

**जालना । प्रतिनिधी -** औद्योगिक प्रशिक्षण संस्थेम ध्ये मुलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सुचना केंद्र द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था जालना यांच्यावतीने दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी १0.00 वाजता भरती म ेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या भरती मेळाव्यासाठी औरंगाबाद येथील नामांकित कंपनी बजाज ऑटो सहभाग घेणार आहे.

आयटीआयच्या शेवटच्या वर्षाला प्रवेशित असलेले मोटार मेकॅनिक, पेंटर (जनरल), टर्नर, मशिनिष्ठ, फिटर वायरमन, इलेक्ट्रॉनिक मेकॅनिक, इलेक्ट्रिशन, डिझेल मेकॅनिक, कोपा या व्यवसायातील उमेदवारांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून सहभाग नोंदवावा. (आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांनी या भरती मेळाव्यासाठी सहभाग नोंदवू नये). असे आवाहन प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था पी.डी. उखळीकर व सहाय्यक प्रशिक्षणार्थी सल्लागार आर. एस. शेळके यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी क. प्रशिक्षणार्थी सल्लागार ए.एस. धाबे व वरिष्ठ लिपिक एस.जी. चव्हाण यांच्याशी ९९२२५३१७६६, ९७६३६0७८५0 या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

# नळविहरा शाळेत भरला बाजार

## विद्यार्थ्यांना दिले व्यावहारिक ज्ञानाचे धडे

**दत्ता देशमुख**
**टेंभुर्णी** - जाफराबाद तालुक्यातील नळविहरा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत शनिवारी आनंदनगरीचे आयोजन करण्यात आले होते. गावच्या आठवडी बाजाराप्रम ाणे चिमुकल्यांच्या या बाजारात सर्वच वस्तू विक्रीसाठी उपलब्ध असल्याने ग्रामस्थांनी शाळेच्या आवारात खरेदीसाठी गर्दी केली होती. त्यामुळे शाळेचा परिसर काही वेळ गर्दीने गजबजून गेला होता.

विद्यार्थ्यांच्या या बाजारात भाजीपाल्यासह भेळपुरी, पापड, गुलाबजामून, जिलेबी, भजे, पेरू, बोरे आदी पदार्थ विद्यार्थ्यांनी विक्रीसाठी मांडले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी आरोळ्या देऊन ग्रामस्थांना साहित्य घेण्यासाठी बोलावले. त्यामुळे शालेय परिसर दणाणून गेला. या बाजारात जवळपास आठ ते दहा हजार रुपयांची उलाढाल झाली. यावेळी सरपंच प्रीती जंजाळ, शालेय समितीचे अध्यक्ष शंकर गाडेकर, निवृत्ती जंजाळ, मुख्याध्यापक शिवहरी



नागरे, शिक्षक दत्तू मुनेमाणिक, सावता तिडके, भाऊसाहेब जाधव, प्रमोद कळंबे, सुनीता खलसे, मंजूषा बकतवार, पूजा गहिरवाल यांच्यासह विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

शाळेत केलेल्या आनंदनगरीच्या आयोजनातून विद्यार्थ्यांना अनेक गणितीय संकल्पनांचा प्रत्यक्ष अनुभव घेता येतो. यात खरेदी-विक्री, नफा-तोटा, मापन आदी प्रत्येक गोष्टीचा विद्यार्थ्यांना अनुभव मिळतो. यात प्रत्यक्ष अनुभव येत असल्याने यातून मिळणारे ज्ञान विद्यार्थ्यांच्या कायम स्मरणात राहते. त्याम ुळे विद्यार्थ्यांचे व्यवहार ज्ञान आणखी पक्के होते. अशी प्रतिक्रीया शिक्षक सावता तिडके यांनी दिली.

# बांधकाम कामगार संयुक्त कृती समितीचा मोर्चा




**जालना । प्रतिनिधी -** जालन्यात विविध मागण्यांसाठी बांधकाम कामगारांनी गांधी चमन ते जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढलाय. जिल्हा बांधकाम कामगार कृती समितीच्या वतीने हा म ोर्चा काढण्यात आला. या वेळी बांधकाम कामगार संघटना कृती समिती निमंत्रक जुनेद मिर्जा, गोविंद आर्दड, अनिल कोलते, रफिक सय्यद, महेश तौर, रेखा तौर तसेच मोठ्या संख्येने बांधकाम कामगार या आंदोलनामध्ये सहभागी झाले होते.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने ऑनलाईन एम.बी.ओ. सी.डब्ल्यु. ही खुली वेबसाईट नियमीत सुरू करून खाजसी कंपनीला बांधकाम कामगार मंडळाने दिलेली कामं बंद करण्याची मागणी बांधकाम कामगारांनी केलीय. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम काम गार कल्याणकारी मंडळातर्फे बांधकाम कामगारांना विविध योजनांचा लाभ देण्यात येतो. या योजनांचा लाभ घेण्यासाठी कामगारांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावा लागतो. मात्र, शासनाने एका खासगी कंपनीला कॉन्ट्रॅक्ट दिल्याने योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्यासारखी सर्व कामं आता खासगी कंपनीच्या माध्यमातून होताय. त्यामुळे कामगारांचे नोंदणी करण्याचे अधिकार रद्द झालेत. यामुळे सदर कंपनीला दिलेलं कॉन्ट्रॅक्ट करून दिलेली काम बंद करण्याची मागणी बांधकाम कामगारांनी केलीय. याच पार्श्वभूमीवर दि.१६ सोमवारी दुपारी दोन वा. च्या सुमारास जालना शहरातील गांधी चमन ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत विविध काम गार संघटनांनी एकत्र येऊन मोर्चा काढत आपलं निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर केलं.

गांधीचमन येथून या म ोर्चास सुरवात करण्यात आली असून शनिमंदिर, ऊड्डानपुल, नूतन वसाहत,अंबड चौफुली मार्गे जिल्हाधिकारी कार्यालय येथे मोर्चा धडकला. यावेळी कामगारांच्या वतीने जोरदार घोषणाबाजी कलाण्यात आल्या. मोर्चामध्ये महिला कामगारांची ऊल्लेखनिय उपस्थिती होती.

# परभणी घटनेतील दोषींविरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा!

## भीम आर्मी संघटनेचे जिल्हाप्रमुख सुभाष दांडेकर यांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** परभणी येथे एका समाजकंटकाने भारतीय संविधानाचा अपमान केल्याचा धक्कादायक प्रकार घडलेला आहे, अशा व्यक्तीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा आणि या घटनेमागचा खरा सूत्र कोण याला चौकशी करून अटक करण्यात यावी असे मागणी, जालना जिल्हाधिकारी कार्यालयात भीम आर्मी संघटनेच्या वतीने जिल्हा प्रशासनाला दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारतीय संविधान हे सर्व जाती धर्मासाठी आहे, अश्या संविधानाचा अपमान परभणी जिल्ह्यात एका सम ाजकंटकाकडून करण्यात आलेला आहे. त्यामुळे देशभरात संतापाची लाट उसळलेली आहे. दरम्यान संविधानाचा अपमान करणार्याला कारवाई करा अशी मागणी करणार्यांवरच उलट पोलीस प्रशासन कारवाई करत आहे. त्यांच्यासाठी कोंबिंग ऑपरेशन राबवत आहे. यावरून प्रशासनाला काय साध्य करायचे आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, ज्या व्यक्तीने संविधानाचा अपमान केला, त्याच्यावर कारवाई सोडून इतरांवर कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे या घटनेची सखोल चौकशी करून संविधानाचा अपमान करणार्या आणि त्याचा मागील खरा सूत्र कोण याची चौकशी करून त्याला अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी, सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी यांचा मृत्यू पोलीस प्रशासनाचे अत्याचार व मारहाणीमुळे झाला आहे. शासनाकडून सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी यांच्या कुटूबीयांना मदत म्हणुन रु.५0 लाख शासनाने तात्काळ द्यावी व त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय सेवेत नौकरीत सामावुन



घेण्यात यावे. तसेच अंबेडकरी समाज बांधव यांच्या वतीने सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी यांना श्रध्दांजली अर्पण करून अंबेडकरी चळवळीतील बांधवांवर पोलीस खात्यातील गुन्हे मागे घेण्यात यावे. आंबेडकरी समाजबांधव सोमनाथ व्यंकट सुर्यवंशी या तरुणाचा सकाळी ५ वाजता जेल मध्ये मृत्यु झाला यास पोलीस प्रशासन व प्रशासन जवाबदार आहे. या मृत्यूबाबत संबंधीत पोलीसांवर कठोर कायदेशीर कार्यवाही करून म नुष्य वधाचे गुन्हा नोंदविण्यात यावा व अंबेडकरी समाज बांधव त्याबाबत भिम आर्मी संघटनेमार्फत सदर संघटनेच्या वतीने निवेदनाव्दारे मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर मराठवाडा कार्याध्यक्ष ॲड. सुभाष सरोदे, जिल्हाध्यक्ष सुभाष दांडेकर यांच्यासह एम.यु. पठाण, शांतीलाल दाभाडे, अंबादास शेजूळ, विठ्ठल कासारे, सारिका मुकेश आटवाला, महेश जाधव, अनिल साळवे, दिपक उघडे, म नोज गुढेकर, दिपक वाकुळकर, किशोर कांबळे, आदिंची नावे आहे.

# बेस्ट आगार व्यवस्थापकांची कर्णबधिर विद्यार्थ्यांनी घेतली भेट - मांडल्या समस्या

**घाटकोपर । प्रतिनिधी -** बेस्टबस ही मुंबई महानगराची जन-वाहिनी आहे, लाखो नागरिक, कार्यालये, त्यातील दैनंदिन व्यवहार आणि शालेय विद्यार्थ्यांचे शिक्षण बेस्टवर अवलंबून आहे, ही बाब अभिनंदनीय आणि कौतुकास्पद असली तरी, दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांना बेस्टच्या दैनंदिन प्रवासात, नियोजनात, कर्मचाऱ्यांकडून, क्वचित नकळतपणे वाईट अनुभव येतो, त्रास ही होतो, या बाबीं संबंधित व्यवस्थापकीय कार्यालयाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी रोचीराम टी.थदानी हायस्कूल फॉर हिअरिंग हँडीकॅप्ड, चेंबूर या शाळेतील रस्ते वाहतूक व नागरी सुरक्षा दल (RSP CD) च्या विद्यार्थ्यांसह ठड्झ शिक्षक अधिकारी विलास पंडित व संजय पिंपळे यांनी मुख्याध्यापक भाग्यश्री वर्तक यांच्या उपस्थितीत देवनार बस आगार येथे भेट घेतली व मुंबई उपनगरातील अशा २७ दिव्यांगाच्या विशेष शाळेतील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या दैनंदिन शालेय प्रवासातील समस्यांचे सहानुभूतीपूर्वक निराकरण होण्यासाठी विनंती केली. युनाइटेड वे मुंबई या सामाजिक संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते सुनील रावत व त्यांच्या समन्वयिका रीना यांनी ही भेट घडवून आणली. देवनार आगारचे सहा.आगार व्यवस्थापक रविंद्र पुजारी यांनी आपल्या कार्यालयात उत्साहाने स्वागत केले, गांभीर्याने समस्या ऐकल्या अनौपचारिक चर्चा करीत आमच्या स्तरावरील समस्यांचे तातडीने निराकरण करण्यात येईल असे आश्वासन दिले. वरिष्ठ कार्यालयाशी संबंधित असलेल्या समस्या योग्य कार्यवाहीसाठी पाठवण्यात येईल, सकाळ व दुपार सत्राच्या शाळा भरण्या-सुटण्याच्या वेळी अधिकच्या बेस्ट बससंख्येसाठी योग्य तो पाठपुरावा केला जाईल असेही त्यांनी आश्वस्त केले.या संपूर्ण संवादाचे इंटरप्रीट नकुल भारमल, संबंधित वर्गशिक्षक तथा विशेष शिक्षक यांनी केले. यावेळी वरिष्ठ वाहतूक अधिकारी संजय भालेराव, बस निरीक्षक अशोक चौरे हे ही उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी आगारातील विविध प्रकारच्या कामकाजाच्या पद्धती, संबंधित कर्मचारी यांच्या भेटी घेतल्या व दिलखुलास संवाद साधला. दिव्यांग विद्यार्थ्यांना दैनंदिन बेस्ट प्रवासात जाणवणाऱ्या समस्यांचे निवेदन ही यावेळी देण्यात आले. रोचिराम टी. थदानी हायस्कूल फॉर हियरिंग हॅंडीकॅप्ड, चेंबूर ही कर्णबधिर विद्यार्थ्यांना RSP उऊ चे शिक्षण देणारी राज्यातील एकम ेव दिव्यांग शाळा असून एकूणच २२ प्रकारच्या दिव्यांगांच्या प्रवास- हक्कासंदर्भात योग्य ते नियोजन व कार्यवाही व्हावी, अशी विनंती करत शाळेच्या मुख्याध्यापिका भाग्यश्री वर्तक यांनी संबंधित सहाय्यक आगार प्रमुख याना केली.




# जालन्यातील जुना सारवाडी रोड ते आयकॉन सिटी रोड दरम्यान रस्त्याच्या मधोमध विद्युत खांब

## अपघात होण्याची शक्यता; खांब बाजूला करण्याची नागरिकांची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालन्यातील जुना सारवाडी रोड ते आयकॉन सिटी रोड दरम्यान रस्त्याच्या मधोमध विद्युत खांब उभा करण्यात आलाय. *रस्त्याच्या मधोमधा आलेले खांब न हटवता नविन रस्त्याचे काम केले असल्याने नागरीकांमध्ये आश्चर्यर्य व्यक्त होत आहे.* रस्त्याच्या म धोमध खांब असल्याने भीषण अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे रस्त्याच्या मधोमध असलेला खांब बाजूला करण्याची म ागणी याभागातील नागरिक करताय. या पूर्वी पण अंबड चौफुली ते उढाण पुल दरम्यान असलेल्या विद्युत खांबाला धडकल्याने एका दुचाकी स्वराचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्या घटनेनंतर सुद्धा जालना शहरात अजून ही अशा प्रकारे रस्त्याच्या म धोमध विद्युत खांब उभे केले जाताय. त्यामुळे रस्त्याच्या मधोमध उभे करण्यात नागरिकांनी मागणी केली आहे. जालना शहरातील विविध भागात रस्त्याचे नवे काम करत असताना रस्त्यात



आलेले विद्युत खांब मृत्यूला आमंत्रण ठरतात. रस्त्याच्या मध्ये उभे केलेले विद्युत खांब तात्काळ बाजूला करून रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करावा अशी मागणी आज दि.१५ रविवार रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास जालन्यातील असलेले विद्युत खांब बाजूला न करताच नवा रस्ता तयार केला जातोय. त्यामुळे रस्त्याच्या मध्ये येणारे विद्युत खांब आधी बाजूला करून मग रस्त्याचे काम करण्यात यावे अशी मागणी नागरिक करताय.

# आश्रमशाळेत शालेय साहित्य वाटप



**मुंबई । प्रतिनिधी -** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), शिव आरोग्य सेना व लायन्स क्लब ऑफ मुंबई मिड टाउन लायन्स क्लब इंटरनॅशनल जिल्हा ३२३१ १ यांच्या संयुक्त विद्यमाने शिव आरोग्य सेनेचे कार्याध्यक्ष डॉ. किशोर ठाणेकर व मुंबईचे मा.नगरपाल, लायन्स इंटरनॅ शनल डिस्ट्रिक्ट ३२३१ १ डिस्ट्रिक्ट गव्हर्नर २०२३-२०२४ चे लायन डॉ. जगन्नाथराव हेगडे यांच्या आदेशानुसार आणि आरोग्य सेनेचे महाराष्ट्र राज्य समन्वयक व लायन्स क्लब ऑफ मिडटावूनचे फर्स्ट व्हि.पी. लायन जितेंद्र दगडू (दादा) सकपाळ यांच्या सूचनेनुसार तसेच हिरकणी प्रतिष्ठान लेडीज सायकल क्लब व मानीनी म्हणजे महिला मंडळाचे अध्यक्ष सौ.सुलेखा गटकळ यांच्या विनंतीनुसार शिव आरोग्य सेना ठाणे जिल्हा व लायन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांच्यावतीने हेल्प मेडिकल चॅरिटेबल ट्रस्टच्या सहकार्याने मराठा विद्या प्रसारक समाज संचलित प्राथमिक माध्यमिक आश्रमशाळा काचूर्ली,तालुका त्रंबकेश्वर,जिल्हा नाशिक या आश्रम शाळेत गोरगरीब साडे तीनशे (३५०) मुलांना सिंगल लाइन बुक ५० डझन, स्क्वेअर लाईन बुक ६ डझन,पेन्सिलचा सेट,रबर,शार्पनर,स्केल वगैरे १५० बॉक्स, लांब सिंगल लाइन बुक ३० डझन, ३६० शार्प पेन,३६० शार्पची लेखन पॅड,५० टी-शर्ट आणि ५० ट्रॅक पँट व इतर सामान व मुलांना खाऊ वाटप करण्यात आले.या प्रसंगी शिव आरोग्य सेनेचे ठाणे जिल्हा संपर्क समन्वयक डॉ.प्रशांत भुईंबर,ठाणे जिल्हा समन्वयक व संस्थापक हेल्प मेडिकल चॅरिटेबल ट्रस्ट चे श्री.एकनाथ अहिरे, जिल्हा समन्वय सहसचिव श्री. सचिन त्रिवेदी,सह-समन्वयक कोपरी पाचपाखाडी श्री.अजय राणे,आश्रम शाळेचे मुख्याध्यापक श्री.गौतम कटारे,अधिक्षिका सौ.मिना साळवे,अधीक्षक श्री.भिसे सर,जेष्ठ शिवसैनिक श्री.विठठल भुईबर ,ड राहूल गांगुर्डे,लायन श्री.राजू रोकडे, श्री.भरत काळे, कु.सुशांत भुईबर,लायन श्री.परेश शिंदे, कु.अभिषेक कुमावत,कु.उदय गांगुर्डे आणि आश्रम शाळेतील सर्व विद्यार्थी,कर्मचारी व पदाधिकारी उपस्थित होते.

# कामगार- शेतकरी- शेतमजुरांची मोट बांधून सरकारच्या विरोधात लढा तीव्र करा - डॉ डी.एल. कराड

**जालना । प्रतिनिधी -** सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स सिटू जालना जिल्हा कमिटीची विस्तारित बैठक आज दिनांक १५ डिसेंबर रोजी सीटू भवन, संजय नगर,जालना येथे पार पडली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी सीटू चे जिल्हाअध्यक्ष मधुकर मोकळे प्रमुख मार्गदर्शक सिटू चे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा राज्याध्यक्ष डॉ. डी. एल. कराड, राज्य महासचिव ड.एम.एच.शेख राज्यसचिव श्रीकांत फोपसे, मारोती खंदारे यांची उपस्थिती होती. देशासह राज्यांमध्ये कामगार कष्टकरी शेतकरी शेतमजुरी विरोधी सरकार स्थापन झाले असून हे सरकार सर्वसामान्यांच्या विचार न करणारे आहे पूर्वी दिलेल्या आश्वासनात ची अंमलबजावणी न करता हे सरकार फक्त भांडवलदाराच्या हिताचे निर्णय घेत आहे. सर्वसामान्य जनतेला महागाईच्या आगीत लोटून उद्योगपतींचे करोडो रुपयाचे कर्ज माफ करण्याचे काम हे सरकार करत आहे. मात्र या सरकारने योजना कर्मचाऱ्यांच्या मानधन वाढीचा विसर पडला आहे, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विचार न करता फक्त भांडवलदारांच्या हिताचा विचार करणे सुरू केले आहे. म्हणून सर्व कामगार कष्टकऱ्यांनी देशातील सर्व घटकांना सोबत घेऊन शिक्षण, रोजगार, आरोग्य, हमीभाव, किमान वेतन या मागण्यांसाठी लढा तीव्र करण्याचा निर्धार या बैठकीत केला पाहिजे आणि येत्या काळात जनतेच्या आवश्यक अशा मुद्द्यांना घेऊन तीव्र लढा उभारावा लागेल, असे डॉ. कराड बैठकीला मार्गदर्शन करताना म्हणाले.

सिटूचे राज्य महासचिव कॉ. एम. एच.शेख यांनीही सरकारच्या कामगार विरोधी धोरणाचा समाचार घेत संघटना मजबूत करा असा कार्यकर्त्यांना सल्ला दिला. बांधकाम कामगार, कंत्राटी कामगार यांच्या प्रश्नावर लढा उभारण्याचा निर्धार ही या बैठकीत करण्यात आला. कृष्णा काटकर, जनार्धन मुळे,अशोक साळवे, यादवराव दिघे, पी.एम.सिरसमकर, मारुती सवडे, गोविंद चांदगुडे,



त्याचबरोबर श्रीकांत फोपसे यांनी बैठकीला मार्गदर्शन केले. बैठकीत कार्य अहवाल सिटूचे जिल्हासचिव ड.अनिल मिसाळ यांनी मांडला त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. येत्या काळात अंगणवाडी कर्मचारी, शालेय पोषण आहार कामगार, आशा वर्कर व आरोग्य कर्मचारी, बैठकीचा अध्यक्ष समारोप मधुकर मोकळे यांनी केला यावेळी प्राचार्य डॉ.सुनंदा तिडके मारुती खंदारे, सरिता शर्मा, प्रभाकर कुलकर्णी, कांचन वाहूळे, शेषराव कान्हेरे, कल्पना मिसाळ, मीरा पांचाळ, लक्ष्मण मोहिते, संगीता तांबे, दीपक खरात, मिरा खरात, संतोष पाटोळे योगेश फुसे, यशोदा गावंडे, सुनंदा पवार, प्रतिभा आहेर, सुनिता म्हस्के, चंपाबाई दाभाडे, हरिश्चंद्र लोखंडे, संजय खंडागळे, साहेब पाटोळे, राहुल हनवते, प्रतिभा काळे, संजय जाधव,संगीता भोसले, ज्योती आखाडे यांच्यासह शेकडो कामगार उपस्थित होते.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.